

# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**
एम.एस.सी., पी.एच.डी.
संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र. विकमं/२०१३–१४/७९४ दिनांक :०६/०३/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली **पुणे शहरांतील**
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

विषय :– 'मी मतदान करणार (I will Vote)' शपथविधी कार्यक्रमाबाबत...

महोदय/महोदया,

मा. कुलगुरु पुणे विद्यापीठ व मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आवाहनानुसार पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्यावतीने समाजामध्ये व महाविद्यालयीन युवकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती होण्याकरीता, आजचा मतदार जागृत होण्यासाठी व सर्वांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मा. कुलगुरु, पुणे विद्यापीठ व मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'मी मतदान करणार (I will Vote)' शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन दि. ९ मार्च २०१४ रोजी, सकाळी ९.०० वा. पुणे विद्यापीठ, मुख्य इमारत याठिकाणी आयोजित करण्यात आलेले आहे.

तरी सदर **'मी मतदान करणार (I will Vote)'** या कार्यक्रमाकरीता आपल्या **महाविद्यालयातील/संस्थेतील/विभागातील ३० विद्यार्थ्यांना दि. ९ मार्च २०१४ रोजी, सकाळी ९.०० वा. पुणे विद्यापीठ, मुख्य इमारत** याठिकाणी पाठवावे, ही विनंती,

कळावे.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

टीप : मतदान जागृती विषयी घोषवाक्य, पोस्टर, बॅनर स्वयंसेवकांनी सोबत घेऊन येणे.